# कार्यालय नगर परिषद बल्लारपूर

Office Phone: 07172-240343, 240347
Fax. No: 07172-240213
Toll-Free No.: 18008330733
Whats app : 9130052358
E-mail.id: municipalcouncilballarpur@gmail.com
Facebook.com/nagarparishadballarpur
Facebook.com/स्वच्छ बल्लारपूर-सुंदर बल्लारपूर
Website. www.ballarpurmc.org

जा. क्र. नपब/आस्था वि/ 1581 /२०१७

दिनांक 25/04 /२०१७

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, बल्लारपूर शहर जिल्हा चंद्रपूर
नगर परिषद, बल्लारपूर
(WALK-IN-INTERVIEW) थेट मुलाखत
जाहीरात

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NHUM), बल्लारपूर शहर अंतर्गत खालील पदे ठराविक वेतनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अर्हताधारक उमेदवारांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी उमेदवारांनी संबंधित पदाच्या शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास आवश्यक त्या शैक्षणिक प्रमाणपत्र व पदांच्या अर्जासह उपस्थित राहावे.

भरावयाची कंत्राटी पदे

अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, LHV, डाटा एंन्ट्री ऑपरेटर कम अकाऊटंट, अटेन्डेट

अर्ज स्विकारण्याचा दिनांक :- १२/०५/२०१७
अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी ९.०० ते ११.०० वाजेपर्यत
अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- जिल्हा रुग्णालय प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर
मुलाखती करीता पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्दीची वेळ :- दुपारी २.३० वाजता
मुलाखतीची वेळ :- दुपारी ३.०० वाजता
मुलाखतीचे ठिकाण :- जिल्हा शल्यचिकित्सक यांचे कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर

| अ. क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकुण पदसंख्या (आरक्षणासह) | वयोमर्यादा | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | एम. बी. बी. एस. एम. डी. | १) बालरोग तज्ञ २) फिजीशियन | खुला -१ | ४५ वर्ष (सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यांकरीता ६२ वर्ष) | रु. २०००/- प्रति भेट (आठवडयातुन किमान १ भेट आवश्यक) |
| २. | LHV | बी. एस. सी. नर्सींग कोर्स | अनुभव आवश्यक | खुला -१ | ३८ वर्ष | रु. १०८००/- |
| ३. | स्टाफ नर्स | १) १२ वी सायन्स २) जी. एन.एम. शासनमान्य संस्थेतुन उत्तीर्ण | १) अनुभवास प्राधान्य २) एम. एन. सी. नोंदणी प्रमाणपत्र | अनु. जाती-१ | ३८ वर्ष | रु. १०८००/- |
| ४. | डाटा एंन्ट्री ऑपरेटर/अकाकंटट | १) बी. कॉम. २) एम. एस. सी आय. टी. प्रमाणपत्र ३) मराठी व इंग्रजी टायपिंग ३० श. प्र. मी. | लेखा विषयक अनुभवास प्राधान्य | अनु. जाती-१ खुला -१ | ३८ वर्ष | रु. ९६००/- |
| ५. | अटेंडंट | ७ वी पास | - | अनु. जाती-१ | ३८ वर्ष | रु. ६०००/- |

अटी व शर्ती :-

१) राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत भरण्यात येणारी सर्व कर्मचा-यांची निवड थेट मुलाखत पध्दतीने करण्यात येईल.

२) सदरची पदे ही मुख्याधिकारी, नगर परिषद बल्लारपूर यांच्या अंतर्गत राहील. परंतु कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे नगर परिषद आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

४) सदर पदे ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ प्रकल्प कालावधीपुरते भरावयाचे असून प्रकल्प बंद होताच सदर पदे आपोआप संपुष्टात येतील.

४) उमेदवारांना खालील कागदपत्रासह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
पासपोर्ट साईज फोटो-२, जन्मतारखेचा दाखला (वयाचा दाखला/१० वी ची शाळा सोडल्याचा दाखला/जन्म प्रमाणपत्र) उमेदवारांची ओळख म्हणुन मतदान ओळखपत्र/आधार कार्ड, रहीवासी प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, मुलाखतीच्या अर्हता कागदपत्रांची मूळ व साक्षांकित सत्यप्रत सोबत आणावी.

५) छाननी अंती पात्र ठरणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात येईल.

६) मुलाखतीसाठी एकास पाच (१:५) याप्रमाणे उमेदवारांना बोलविण्यात येईल.

७) जास्त उमेदवार आल्यास छाननी अंती एका पदास पाच उमेदवार याप्रमाणे पदानुसार पदवी/पदविका/नर्सींग कोर्स/जीएनएम/अकाऊंटंट/अटेंन्डट इत्यादी या शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परिक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कटऑफ लावण्यात येईल.

८) एकूण १०० गुणांची मुलाखत राहील.

९) यामध्ये पदवी/पदविका/नर्सींग कोर्स/जीएनएम/अकाऊंटंट/अटेंन्डट शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत जास्त ८० गुण देण्यात येतील.
अ) शेवटच्या वर्षाचे गुण ग्राहय धरले जातील.
ब) अतिरिक्त शैक्षणिक पात्रता असल्यास जास्तीत जास्त ५ गुण देण्यात येतील.
क) ५ गुण अनुभवास आधारित राहील. दोन वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ० गुण, २ वर्ष अनुभव असल्यास ३ गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी एक याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरला जाईल.
ड) १० गुण विषय ज्ञानासाठी देण्यात येतील.

१०) अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी हे (Honorarium Basis) वर विशेषतज्ञाची नियुक्ती करुन भरले जाईल. विशेष तज्ञामध्ये (Gynecologist, Pediatrician, Physician) यांचा समावेश असेल. विशेषतज्ञांची प्रति भेट/प्रति दिवस रु. २,०००/- याप्रमाणे मोबदला देण्यात येईल.

११) निवड समितीने कौशल्य चाचणीद्वारे अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, एलएचव्ही या पदांची विशेषज्ञनिहाय Skill Assessment Protocol प्रमाणे चाचणी घेण्यात येईल.

१२) निवड झालेले उमेदवार व प्रतीक्षा यादीवरील उमेदवार यांची यादी त्याच दिवशी सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

१३) नियुक्तीबाबतचा अंतिमक अधिकार अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी राखुन ठेवला आहे.

१४) जाहीरात व पदाच्या अर्जाचा नमुना जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचे संकेत स्थळावर www.chanda.nic.in वर उपलब्ध आहे.तसेच नगर परिषद बल्लारपूर यांचे संकेत स्थळ www.ballarpurmc.org वर उपलब्ध आहे.

१५) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत जिल्हा शल्यचिकित्सक यांचे कार्यालय, चंद्रपूर व आस्थापना विभाग, नगर परिषद बल्लारपूर येथे पाहावयास मिळतील.

सदस्य सचिव
तथा मुख्याधिकारी
नगर परिषद बल्लारपूर

अध्यक्ष
तथा जिल्हा शल्यचिकित्सक
जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर

अर्जाचा नमुना

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान नगर परिषद, बल्लारपूर शहर

ज्या पदाकरीता अर्ज करावयाचे आहे त्या पदाचे नाव :- ------------------------------------

| उमेदवाराने स्वत:चा फोटो साक्षांकित करुन लावावा. |
|---|

प्रति,

अध्यक्ष
राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान,
निवड समिती, बल्लारपूर

उमेदवाराचे नाव (संपुर्ण) :- ------------------------------------
उमेदवाराचा पत्ता (कायम) :- ------------------------------------
------------------------------------
भ्रमणध्वनी क्रमांक :- ------------------------------------
ई-मेल आयडी :- ------------------------------------
जन्मतारीख :- / /
दिनांक १२/०५/२०१७ रोजीचे वय :- वर्ष ------------ महिने ------------ दिवस ------------
लिंग :- पुरुष/स्त्री जात :- - - - - प्रवर्ग :- - - - - -
विवाहीत/अविवाहीत :- ------------------------------------

शैक्षणिक अर्हता

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ/बोर्डाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतीम वर्षाची टक्केवारी | इतर शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

अनुभव :-

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | कामाचे स्वरुप | कालावधी | | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

माझे माहीतीप्रमाणे, वरील माहीती दस्ताऐवजानुसार बरोबर असून, त्यात काही चुक असल्यास अथवा ऐखादी माहीती मी लपविण्याचा प्रयत्न केल्यास मला वैयक्तिक रित्या जबाबदार धरुन माझी केलेली निवड रदद करण्याचा अधिकार समितीला राहील.

स्थळ :-

उमेदवाराची स्वाक्षरी व नांव

दिनांक :-